# मुंबई विद्यापीठ

परिपत्रकः— क्र. टीएएस(सीटी)/०२/२०१७—२०१८

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/संस्था,
मुंबई विद्यापीठ.

विषयः महाविद्यालयातील/संस्थेतील प्राचार्य/संचालक/शिक्षक/ग्रंथपाल/संचालक शारिरीक शिक्षण इ. पदांच्या मान्यतेची/पदोन्नतीची प्रक्रिया संगणकीकृत करणेबाबत.

संदर्भः संलग्नता/आयसीसी/२०१६—१७/२३ दि. ३०/१२/२०१६
संलग्नता/आयसीसी/२०१६—१७/२७ दि. २५/०१/२०१७
संलग्नता/आयसीसी/२०१६—१७/२९ दि. १०/०२/२०१७
संलग्नता/आयसीसी/२०१६—१७/३० दि. २२/०२/२०१७

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयांकित संदर्भिय परिपत्रकांच्या अनुषंगाने आपणांस सूचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१७—१८ पासून शिक्षक नियुक्ती व मान्यता विभागांतर्गत देण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या मान्यतेबाबतची प्रक्रिया ऑनलाईन करण्यात आली आहे. तद्अनुषंगाने दि. १२/०५/२०१७ पासून पुढील काळात १) प्राचार्य/संचालक/शिक्षक/ग्रंथपाल/संचालक शारिरीक शिक्षण इ. यांच्या निवड समिती अहवालास मान्यता देणे २) प्राचार्य/संचालक/शिक्षक/ग्रंथपाल/संचालक शारिरीक शिक्षण यांना अंतिम मान्यता देणे, ३) पदोन्नती देणे इ. बाबत महाविद्यालयांकडून संबंधित प्राचार्य/संचालक/शिक्षक/ग्रंथपाल/संचालक शारिरीक शिक्षण यांच्या पदांच्या मान्यतेचे अर्ज तसेच आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत पात्र शिक्षकांचे अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने विद्यापीठ स्विकारणार आहे.

यास्तव, सर्व महाविद्यालये/संस्था यांना कळविण्यात येते की, दि. १२/०५/२०१७ पासून मान्यतेचे/पदोन्नतीचे प्रस्ताव फक्त ऑनलाईन पद्धतीने स्विकारले जातील. महाविद्यालयांमार्फत इतर माध्यमांनी प्राप्त झालेल्या अर्जांची दखल किंवा त्यांची पुढील कार्यवाही विद्यापीठ स्तरावर होणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

सदर प्रक्रियेमध्ये महाविद्यालयांचे/संस्थांचे पूर्ण सहकार्य अपेक्षित आहे. तसेच प्राचार्य/संचालक/शिक्षक/ग्रंथपाल/संचालक शारिरीक शिक्षण यांच्या पदांची भरती प्रक्रिया तसेच पदोन्नती प्रक्रियेदरम्यान जी कागदपत्रे ऑनलाईन पद्धतीने सादर केली जातील त्यांच्या सत्यतेबाबतची संपूर्ण जबाबदारी संबंधित संस्थाचालक/प्राचार्य यांची राहील, याची नोंद घ्यावी

...२/—

तसेच सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, **पद मान्यता व पदोन्नती यांचे संगणकीकरण केलेले असल्याने सर्व संलग्नित महाविद्यालये/संस्थांना सदरबाबतच्या ऑनलाईन प्रक्रिया प्रणालीसाठी विषयनिहाय व पदनिहाय सेवा शुल्क रु. ४९००/– (रुपये चार हजार नऊशे फक्त) [ per subject per designation Rs. 4900/- (Rupees Four Thousand Nine Hundred Only) for Appointment and CAS ] आकारण्यात येत आहे**. सदर सेवा शुल्क जाहिरात मंजूर करुन घेतेवेळी खालील देण्यात आलेल्या संकेतस्थळांचा वापर करुन ऑनलाईन भरावे. सेवाशुल्क भरल्यानंतरच महाविद्यालयांना मंजूर जाहिरातीचा मसुदा ऑनलाईन महाविद्यालयाच्या लॉगीन मध्ये देण्यात येईल. त्याचप्रमाणे महाविद्यालयातील/संस्थेतील जे शिक्षक आश्वासित योजनेअंतर्गत पदोन्नतीस पात्र आहेत व महाविद्यालयांनी त्यांच्या पदोन्नतीकरिता मा. कुलगुरुंचे प्रतिनिधी व विषयतज्ञांची विद्यापीठाकडे विचारणा केली आहे, त्यांनी प्रत्येक शिक्षकांच्या पदोन्नतीकरिता सेवा शुल्क रु. ४९००/– ऑनलाईन भरल्यानंतर संबंधित शिक्षकांच्या पदोन्नतीकरिता मा. कुलगुरुंचे प्रतिनिधी/विषयतज्ज्ञ विद्यापीठामार्फत देण्यात येतील, याची कृपया नोंद घ्यावी.

सेवाशुल्क भरण्याकरिताचे संकेतस्थळ :– **https://muonline.org.in ⇨ TAAS Section**

(डॉ. एम. ए. खान)
कुलसचिव

मुंबई – ४०० ०३२.
दिनांक :– ०६ मे, २०१७